2 SEP 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# योगशास्त्र अभ्यासामुळे रोजगाराची संधी

## कृष्णा जोशी : शिवाजी विद्यापीठात एमए योगशास्त्र

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : योगाभ्यासास जगभरात प्रशंसा आणि लोकप्रियता मिळत असून, योगशास्त्राचे गाढे अभ्यासक बनून जगभरामध्ये योगाचा प्रचार आणि पसार करण्याची व रोजगार प्राप्त करण्याची उत्तम संधी शिवाजी विद्यापीठाच्या एमए योगशास्त्र या अभ्यासक्रमामुळे निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन पुणे येथील ज्येष्ठ योगतज्ज्ञ कृष्णा जोशी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत एमए योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, सिद्धार्थ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.




शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत या शैक्षणिक वर्षापासून एमए योगशास्त्र या दोन वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ योगतज्ज्ञ कृष्णा जोशी यांनी मार्गदर्शन केले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान प्रणाली आहे. भारतीय ज्ञान प्रणालीचे अध्ययन, अध्यापन कसे केले पाहिजे असे सांगितले.

चंद्रकांत कांबळे यांनी योग नृत्य सादर केले. डॉ. रामचंद्र पवार यांनी प्रास्ताविक केले. योगशिक्षक आसावरी कागवाडे यांनी ओळख करून दिली.

महासत्ता

# डॉ. विलास शिंदे यांची निवड

कोल्हापूर, ता.३१(प्रतिनिधी)

शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. विलास नेताजी शिंदे यांची शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदी निवड करण्यात आली.

शिवाजी विद्यापीठाचे ते ११ वे कुलसचिव आहेत. कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी डॉ. शिंदे यांना आज नियुक्तीचे पत्र प्रदान केले.यावेळी डॉ.शिंदे म्हणाले, कुलसचिव पदाची जबाबदारी माझ्यादृष्टीने सर्वोच्च संधी असून येथील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्यास प्राधान्य राहील. ही संधी दिल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरु यांचे मी आभार मानतो.

पुढारी

# विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागांसाठी आज मतदान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागांसाठी शनिवारी (दि. २) निवडणूक होणार आहे. दोन जागांसाठी विद्यापीठ विकास आघाडीचे दोन व 'सुटा'चे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

विद्यापीठ प्रशासनाकडून निवडणुकीची तयारी पूर्ण झाली आहे. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमधील राजर्षी शाहू सभागृहात दुपारी १ वाजता मतदानास सुरुवात होईल. विद्या परिषदेचे ८३ सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागांसाठी मतदान करणार आहेत.

पुण्यनगरी

# विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेसाठी आज मतदान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर विद्या परिषदेमधून दोन सदस्य निवडण्यात येणार आहेत. दोन जागांसाठी शनिवार, दि. २ सप्टेंबर रोजी मतदान होत आहे. या दोन जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत २१ ऑगस्टपर्यंत होती. त्याच दिवशी सायंकाळी अर्जांची छाननी झाली. निवडणुकीसाठी शिक्षक गटातून जगदीश सपकाळे, डॉ. सुनील चव्हाण, डॉ. सुनील बनसोडे यांनी फॉर्म भरले. डॉ. बनसोडे यांनी माघार घेतली, तर महिला गटातून एका जागेसाठी डॉ. वर्षा मेंदर्गी, डॉ. तृप्ती करीकट्टी, डॉ. निशा पवार मुडे, डॉ. मंजिरी मोरे, डॉ. रूपाली संकपाळ यांच्यासह एकूण पाच अर्ज होते. यापैकी डॉ. करीकेट्टी, डॉ. मोरे, डॉ. पवार यांनी माघार घेतली. यामुळे डॉ. वर्षा मैंदर्गी व डॉ. रूपाली संकपाळ यांच्यामध्ये निवडणूक होत आहे. मैंदर्गी या विकास आघाडीच्या, तर संकपाळ या सुटाच्या उमेदवार आहेत. महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर विद्या परिषदमधून एक सदस्य पाठवायचा आहे. त्यासाठी दोन अर्ज प्राप्त आहेत. यामध्ये प्राचार्य अर्जुन एम. जाधव व डॉ. रूपाली संकपाळ यांचे अर्ज आहेत. या निवडणुकीसाठी विद्या परिषदेच्या २ सप्टेंबरच्या बैठकीमध्ये मतदान होणार आहे.

सकाळ

# व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागांसाठी आज मतदान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद या अधिकार मंडळावर विद्या परिषदेतून दोन सदस्य निवडण्यासाठी शनिवारी (ता. २) विद्यापीठात मतदान होणार आहे. या दोन जागांपैकी शिक्षक गटात डॉ. सुनील चव्हाण आणि जगदीश सपकाळे यांच्यामध्ये, तर महिला गटामध्ये डॉ. वर्षा मैंदर्गी आणि डॉ. रूपाली संकपाळ यांच्यामध्ये लढत होणार आहे. दरम्यान, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर विद्या परिषदमधून एक सदस्य पाठविला जातो. त्यासाठी प्राचार्य अर्जुन जाधव आणि डॉ. रूपाली संकपाळ यांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यासाठी देखील मतदान होणार आहे.

पुढारी

# पदवी, पदव्युतर ६४७ अभ्यासक्रमांचे निकाल विद्यापीठाकडून घोषित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाकडून मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या आजअखेर ६४७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षा व्यवस्थितपणे सुरु आहेत. शुक्रवारी बॅचलर ऑफ एज्युकेशन अभ्यासक्रमाची परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे झाल्या. परीक्षेला १७५९ विद्यार्थी उपस्थित होते.

१ सप्टेंबर बी. आर्किटेक्चर अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले ओहत. भरारी पथकाकडून सातारा जिल्ह्यातून २ व सांगली जिल्ह्यातून १ अशा गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुण्यनगरी

# विद्यापीठ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षाअंतर्गत शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी एकूण १७५९ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, दि. १ सप्टेंबर रोजी बॅचलर ऑफ आर्किटेक्ट अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले असून, आजअखेर ६४७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थापन केलेल्या भरारी पथकाकडून दि. १ सप्टेंबर रोजी सातारा जिल्ह्यातून २ व सांगली जिल्ह्यातून १ अशा ३ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली आहे.